**कर्तृत्त्व**

एक तटावर आव्हान उभे, दुज्या तटावर कर्म ठाम ।
दोघासही या जोड देतसे, प्रयत्न असे तयाचे नाम ॥

मन पटलावर खुलते, प्रत्येकाचे स्वप्न अनाम ।
सदर स्वप्न भंगता, वाटते ती वाट बदनाम ॥ १ ॥

कुणी जातो आडवाटेने, मार्ग जोखिला असे हराम ।
ईमानाच्या कष्टाच्या मार्गी, सुखात मोजक्या कुणा आराम ॥ २ ॥

प्रवासात जो तत्व बाळगे, जयकार तयाचा होय सुनाम ।
तो असता/ नसता होतसे, उल्लेख तयाचा हेच ईनाम ॥ ३ ॥

जीवनाचा प्रवास अगम्य, सहज न लाभे निजधाम
कष्टातूनी बहरे लक्ष्य निरंतर, कर्तृत्वास त्या नित्य सलाम ॥ ४ ॥

**सचिन पु. कुलकर्णी**
www.saarthbodh.com